नियमित दिवाणी दावा क्र.१६/२०२४
शोभा व ईतर वि. रामप्रसाद व ईतर

## निशाणी क्र.११ खाली आदेश

प्रस्तुत अर्ज वादींनी न्यायालयीन आयुक्त नेमणुक होणेकरीता केलेला आहे.

२) वादींनी असे कथन केले की, वादीने मुळ दावा प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढणेसाठी व त्याचा ताबा मिळणेसाठी दाखल केले आहे. वादीने अतिक्रमण निश्चीत करण्यासाठी मोजणी होवुन मिळावी याकरीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांना विनंती केली. परंतु सदर कार्यालयाने मोजणी न करता न्यायालयात जाण्याचे सांगितले. प्रतिवादींनी वादींच्या शेतजमीनीवर अतिक्रमण केले आहे. करीता भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमनुक व्हावी, अशी विनंती वादींनी केली.

३) प्रतिवादी क्र.१, ३, ५, ७ व ९ न्यायालयात हजर झाले. परंतु त्यांना पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.२, ४, ६, ८ व १० यांना दावा समन्स तामील होवुन देखील त्या न्यायालयासमक्ष हजर झाल्या नाहीत. सदरचा दावा त्यांच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात येत आहे.

४) अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दावा समन्स तामील झालेले असुन त्यांनी प्रकरणात हजर होवुन दावा जमीन मोजणी करण्याच्या अर्जास हरकत घेतलेली नाही. सदर बाब लक्षात घेता, न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती केल्यास निश्चितच दाव्याच्या परिणामकारक निकालासाठी व उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी मदत होईल. तसेच, सदर न्यायालयीन आयुक्तची मागणी ही पुरावा गोळा करण्यासाठी केलेली दिसुन येत नाही.

करीता, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. तालुका निरीक्षक भुमिअभिलेख कार्यालय, घनसावंगी, ता. घनसावंगी, जि. जालना यांना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.

२. न्यायालयीन आयुक्ताने मौजे सिंदखेड, ता. घनसावंगी, जि. जालना येथील गट क्र.८४ मधील वादी व ईतर सह हिस्सेदार यांचे ७/१२ उता–यातील नोंदीप्रमाणे आणि आवश्यकता भासल्यास लगतच्या शेतजमीनींची मोजणी भूमापन संहिते अन्वये करावी व मोजणी नकाशा तयार करुन सविस्तर मोजणी अहवाल नकाशासह न्यायालयात दिनांक १४/१०/२०२४ पावेतो सादर करावा.

३. मोजणीसाठी आवश्यक दस्तऐवज पुर्तता उभयपक्षांनी तात्काळ करावी.

४. न्यायालयीन आयुक्ताचा आवश्यक तो खर्च वादीने सोसावा व तो खर्च भूमी अभिलेख कार्यालय, घनसावंगी येथे भरावा.

५. न्यायालयीन आयुक्त नियुक्तीची पत्र देण्यात यावे.

CHETAN SURESH JAGTAP
Digitally signed by CHETAN SURESH JAGTAP
Date: 2024.08.26 15:23:35 +0530

दिनांक २६/०८/२०२४

(चेतन जगताप)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
घनसावंगी.